Friday, February 06, 2009

**Smoking affects kids mentality**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 2

# धूम्रपानाचा बालमनावर परिणाम

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - चित्रपटातील धूम्रपानाच्या दृश्यांवर बंदी घालण्याच्या आरोग्य व समाजकल्याण मंत्रालयाच्या निर्णयाला रद्दबातल ठरवताना २३ जानेवारी रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने, हा निर्णय म्हणजे कलाकाराच्या कलात्मक आविष्कारावर अतिक्रमण असल्याचे सुनावले. या निर्णयाने बॉलीवूड जगत सुखावले. मात्र चित्रपटांतील धूम्रपानांच्या दृश्यांचा समाजमनावर खरेच विपरित परिणाम होत नाही? काही संस्थांनी केलेल्या पाहणीतून अशा दृश्यांचा प्रचंड परिणाम बालमनावर होत असतो, हे सिद्ध झाले आहे. पुढील आकडेवारीतून हे स्पष्ट होते.



चित्रपटातले धूम्रपानाचे दृश्य हे वास्तववादी चित्र उभे करीत नाहीच, तसेच त्यात कसल्याही प्रकारचे कलात्मक स्वातंत्र्य दिसून येत नाही. हा सर्व व्यावसायिक भाग आहे. पडद्यावरील धूम्रपानाची दृश्ये पाहून प्रेक्षकांवर परिणाम होतो. विशेषत: लहान मुले त्याचे अनुकरण करतात.

- डॉ. पी.सी. गुप्ता, संचालक, हेलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ

## सर्वेक्षण काय सांगते?

- अमेरिकेच्या राष्ट्रीय कॅन्सर संस्थेने २००८ साली केलेल्या अभ्यासात, धूम्रपान न करणाऱ्या लहान मुलांचे आवडते कलाकार पडद्यावर सातत्याने धूम्रपान करतात तेव्हा या लहान मुलांपैकी बहुतांश मुले वयाच्या सोळाव्या वर्षी धूम्रपानास सुरुवात करतात.
- दूरचित्रवाणीवर किंवा सिनेमात प्रदर्शित होणाऱ्या तंबाखूजन्य उत्पादनांचा जनमानसावर, खासकरून लहान मुलांवर भावनिक परिणाम होतो. तंबाखूजन्य उत्पादनांचे तरुण पिढी हेच मुख्य टार्गेट ठरत चालली आहे. दरवर्षी जगभरातील सुमारे ८० हजार ते १ लाख तरुण मुले धूम्रपानाकडे आकर्षित होतात.
- बर्निंग ब्रेन सोसायटी या आणखी एका बिगरसरकारी संस्थेने या संबंधात बरीच महत्त्वाची तथ्ये आपल्या अहवालात मांडली आहेत. चित्रपटात तंबाखूजन्य उत्पादनांना स्टाईल व ग्लॅमरस पद्धतीने मांडले जाते. साहजिकच त्याचा परिणाम तरुण पिढीवर होतोच व त्यांच्यात धूम्रपान करण्याची इच्छा बळावू लागते. आपल्या आवडत्या कलाकाराला पडद्यावर धूम्रपान करताना पाहून ही लहान मंडळींसुद्धा पेन, पेन्सिलचा वापर सिगारेटसारखा करतात. आवडत्या कलाकाराचे हे अंधानुकरण करण्याचे मुलांमधील प्रमाण जवळपास ६० टक्के इतके आहे.